Exh-04

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ११०९/२०२५**

अरोली पोलिस ठाणे

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे प्रकरण बावीस संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा यांचे न्यायालयात**

१. **गुन्हा घडल्याची तारीख** - १७.०२.२०२५

२. **फिर्याद दाखल झाल्याची तारीख** - १७.०२.२०२५

३. **फियादीचे नांव व पत्ता** - मनोज जयस्वाल
अरोली पोलिस ठाणे

४. **आरोपीचे नांव व पत्ता** - **राजहंस सुरेंद्र तेलंग,**
व.व. २४, व्यवसाय – चालक,
रा.वायगाव, ता.मौदा, जि. नागपूर.

५. **आरोपीत गुन्हा** - मोटर वाहन कायदा कलम १८५ प्रमाणे

तुम्ही दि. १७.०२.२०२५ रोजी ००.४५ ते ०१.१५ वाजणेचे सुमारास मौजा रामटेक ते भंडारा रोडवर, येथे त्याच्या ताब्यातील मोटार वाहन क्र. एम.एच.४० सी.एन.३०२० ही दारुचे सेवन करुन चालवत असताना मिळुन आलेने तुम्ही मोटर वाहन कायदा कलम १८५ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे असा तुमचेवर आरोप आहे.

६. **आरोपीचा जबाब** -

प्रश्न क्र.१ - तुम्हाला फिर्याद ची प्रत मिळाली का ?

उत्तर - होय.

प्रश्न क्र.२ - तुम्हाला आरोप वाचून दाखविण्यात आले ते समजले का ?

उत्तर - होय.

प्रश्न क्र.३ - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर - मला गुन्हा कबुल आहे.

दिनांक - १४.०३.२०२६

समक्ष,

14.3.26

( एल. एम. पठाण )

आरोपीची सही

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा

आरोपीने स्वतः अर्ज देवुन मोटर वाहन कायदा कलम १८५ प्रमाणे गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. आरोपीचे म्हणणे ऐकले. सदरचा गुन्हा हा आरोपीचे हातुन पहिल्यांदाच घडलेला असून त्याने कमीत कमी दंडाची शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे. गुन्ह्याचे स्वरुप तसेच आरोपीचे कबूलीचे कथन यांचा विचार करता आरोपीस द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचीत होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) आरोपी - **राजहंस सुरेंद्र तेलंग,** यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये मोटर वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत दोषी ठरविणेत येत आहे.

२) आरोपीने मोटर वाहन कायदा कलम १८५ या गुन्हयासाठी रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन हजार फक्त) द्रव्यदंड भरावा. दंड न भरलेस आरोपीस ७ (सात) दिवसांची साधी कैद सुनावणेत येत आहे.

14.3.26

मौदा

( एल. एम. पठाण )

दि. १४.०३.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा

Fine Rs. 10,000/- (Rs Ten thousand only)
deposited by accused
vide Receipt No 149/26

S.W.
14.3.26